शब्दांना सत्याची धार

# प्रहार



रसाळगड किल्ल्याच्या पायथ्याशी दरड कोसळली

पान ३



गणरायाच्या आगमनासाठी जिल्हावासीय सज्ज

पान ८

रत्नागिरी ● मंगळवार २६ ऑगस्ट, २०२५

RNI Reg.No.: एमएएचएमएआर/२००८/३५१८० ● वर्ष २१ ● अंक २८५ ● पाने ८ ● ₹ ५.००

www.prahaar.in epaper.prahaar.in

# मंगलमूर्ती मोरयाऽऽ : कोकणवासीय गणेशभक्तांना घेऊन 'शिवसेना एक्सप्रेस' रवाना!

## माजी मुख्यमंत्री खा. नारायण राणे, खा. श्रीकांत शिंदे आणि आ. निलेश राणे यांनी गाडीला दाखविला हिरवा झेंडा

## गणेशोत्सवासाठी दरवर्षीप्रमाणे आ. निलेश राणे यांच्या पुढाकारातून 'शिवसेना एक्सप्रेस' रेल्वेगाडीची व्यवस्था








**मुंबई (प्रतिनिधी)**

गणेशोत्सवासाठी आपल्या गावी जाणाऱ्या कोकणवासीयांना सुरक्षित आणि सुखद प्रवास मिळावा यासाठी दरवर्षीप्रमाणे यंदाही 'शिवसेना एक्सप्रेस' या विशेष रेल्वेगाडीची व्यवस्था करण्यात आली. २५ ऑगस्ट रोजी, ही विशेष गाडी दादर स्थानकावरून कुडाळ, कोकणच्या दिशेने रवाना झाली. यावेळी प्रवाशांनी मंगलमूर्ती मोरयाऽऽ चा एकच जयघोष केला.

यावेळी महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आणि खासदार नारायण राणे, खासदार श्रीकांत शिंदे आणि आमदार निलेश राणे यांनी हिरवा झेंडा दाखवून गाडीतील प्रवाशांना प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी मोठ्या संख्येने शिवसेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि कोकणवासीय नागरिक उपस्थित होते. या रेल्वेमुळे मुंबईत राहणाऱ्या हजारो गणेशभक्तांना कोणत्याही अडचणीशिवाय आणि सुरक्षितपणे आपल्या गावी पोहोचता येणार आहे. शिवसेना एक्सप्रेसच्या या उपक्रमामुळे कोकणवासीयांच्या चेहऱ्यावर

(पान २ वर)

### वेचक

## एस.टी. कर्मचाऱ्यांचा ऑगस्टचा पगार आज होणार

**मुंबई (प्रतिनिधी):** राज्य शासनाच्या इतर कर्मचाऱ्याप्रमाणे एस.टी.च्या सुमारे ८३ हजार कर्मचारी व अधिकाऱ्यांचा ऑगस्ट महिन्याचा पगार गणपती उत्सवापूर्वी म्हणजेच २६ ऑगस्ट रोजी देणार असल्याची माहिती परिवहन मंत्री आणि एस. टी. महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली. याबाबत बोलताना मंत्री सरनाईक म्हणाले की, एस.टी.च्या कर्मचाऱ्यांचा पगार हा महिन्याच्या ७

(पान २ वर)

## आमदार अमित साटम यांच्याकडे मुंबई भाजप अध्यक्षपदाची धुरा

**मुंबई (प्रतिनिधी) :** आगामी मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपकडून आमदार अमित



साटम यांची सोमवारी मुंबई अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. भाजप प्रदेश कार्यालयात आयोजित बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, मावळते अध्यक्ष आशिष शेलार यांसह प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत ही घोषणा करण्यात आली. साटम हे आपल्या आक्रमक वक्तृत्व शैलीसाठी प्रसिद्ध आहेत. आ. आशिष शेलार यांचा मुंबई भाजपा अध्यक्षपदाचा कार्यकाळ संपला. त्यानंतर आता भाजपाने

(पान २ वर)

# कितीही दबाव टाकला तरी आमच्यासाठी शेतकरी महत्त्वाचे

### ट्रम्प टॅरिफवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे भाष्य

**अहमदाबाद (वृत्तसंस्था)**



विदेशातून कितीही दबाव टाकण्याचा प्रयत्न केला तरीही आमच्यासाठी देशातील शेतकरी महत्त्वाचे आहेत, असे भाष्य पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे नाव न घेता केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी अहमदाबादमधील खोडलधाम मैदानावर ५,४०० कोटी रुपयांच्या विविध विकास प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी केली. यावेळी जाहीर सभेला संबोधित करताना त्यांनी डोनाल्ड ट्रम्पच्या शुल्कावरील मोठे विधान केले. ते म्हणाले की, कितीही दबाव टाकला तरी, आम्ही आमची ताकत वाढवण्याचे काम करत राहू.

पंतप्रधान मोदींनी स्पष्ट केले की, देशातील शेतकरी आणि पशुपालकांचे हित सरकारसाठी सर्वोतोपरी आहे. मी माझ्या लहान उद्योजकांना, लहान दुकानदारांना, शेतकरी, पशुपालकांना सांगू इच्छितो की, आमच्यासाठी देशातील लहान उद्योजक, शेतकरी आणि पशुपालक महत्त्वाचे आहेत. आम्ही कधीही तुमचे नुकसान होऊ देणार नाही.

यावेळी पंतप्रधान मोदींनी देशातील जनतेला भारतात बनवलेल्या वस्तूंना प्राधान्य देण्याचे आवाहन केले. ते म्हणाले की, सजावटीच्या वस्तू असोत किंवा भेटवस्तू असोत, आपण आपल्या देशात बनवलेल्या वस्तू खरेदी केल्या पाहिजेत. पंतप्रधानांनी व्यावसायिकांना परदेशी वस्तूंची विक्री टाळण्याचे आवाहन केले आहे. आमचे सरकार जीएसटीमध्ये सुधारणा करत आहे, दिवाळीपूर्वी तुम्हाला एक मोठी भेट मिळेल. जीएसटी सुधारणांमुळे लघु उद्योगांना

(पान २ वर)



भगवान श्री विष्णूंच्या अवतारांपैकी एक असलेले भगवान वराह यांच्या जयंतीनिमित्त सोमवारी सकल हिंदू समाज, चेंबूर यांच्यावतीने आयोजित कार्यक्रमाला उपस्थित राहून मंत्री नितेश राणे यांनी भगवान वराह यांची महापूजा केली.

## आरएसएसच्या विजयादशमी उत्सवाला माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद मुख्य अतिथी

**नागपूर**


राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांना शताब्दी वर्षातील विजयादशमीच्या उत्सावासाठी मुख्य पाहुणे म्हणून आमंत्रित केले आहे. संघाचा शताब्दी वर्षातील ऐतिहासिक विजयादशमी सोहळा २ ऑक्टोबर रोजी सकाळी ७:४० वाजता नागपूरच्या रेशमबाग येथे आयोजित करण्यात आला आहे. यावेळी आरएसएस प्रमुख मोहन भागवत यावेळी आपले भाषणही देणार आहेत. विशेष म्हणजे संघाच्या

(पान २ वर)

## जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांना 'महाराष्ट्र भूषण' पुरस्काराने सन्मानित करावे

### मत्स्य व्यवसाय व बंदरे विकास मंत्री नितेश राणे यांचे मुख्यमंत्र्याना पत्र

**मुंबई**





जगद्गुरू रामानंदाचार्यजी नरेंद्राचार्यजी यांना महाराष्ट्राचा सर्वोच्च नागरी सन्मान असलेला 'महाराष्ट्र भूषण' पुरस्कार प्रदान करण्याची विनंती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे राज्याचे मत्स्य व्यवसाय आणि बंदरे विकास मंत्री नितेश राणे यांनी केली आहे.

याबाबत मुख्यमंत्री फडणवीस यांना लिहिलेल्या पत्रानुसार ना. नितेश राणे यांनी म्हटले आहे की, रत्नागिरीतील नाणीज येथील दक्षिण पिठाचे रामानंदाचार्य जगद्गुरू संत श्री रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांचे आध्यात्मिक तसेच सामाजिक क्षेत्रातील योगदान मोठे आहे. त्यांचे धार्मिक, सांस्कृतिक आणि समाजजागृतीचे कार्य अविरत सुरू असून, महाराष्ट्रासह संपूर्ण राष्ट्राला याचा अभिमान आहे. गेल्या अनेक दशकांपासून त्यांची निःस्वार्थ सेवा आणि समर्पित प्रयत्नांमुळे समाजावर सकारात्मक परिणाम झाला आहे. त्यांनी दोन पिढ्यांना

(पान २ वर)

## पोटच्या एक महिन्याच्या मुलीचा खून करणाऱ्या जन्मदात्रीस जन्मठेप

### चिपळूण जिल्हा व सत्र न्यायाधीश डॉ. अनिता नेवसे यांनी ठोठावली शिक्षा

**चिपळूण (प्रतिनिधी)**

अतिरिक्त सत्र न्यायालय चिपळूण येथील जिल्हा व सत्र न्यायाधीश डॉ. अनिता एस. नेवसे यांनी आज एक महिन्याच्या बालिकेच्या खून प्रकरणी आरोपी मातेस भा.द.वि. कलम ३०२ या गुन्ह्याखाली दोषी धरून तिला आजन्म कारावास व २५ हजार रुपये दंड व दंड न भरल्यास दोन वर्षे सक्त मजुरीची शिक्षा ठोठावली.

या गुन्ह्यातील आरोपी शिल्पा प्रविण खापले ही तिच्या दोन लहान मुली, नवरा व सासू-सासरे यांच्यासोबत चिपळूण तालुक्यातील वहाळ, घडशीवाडी येथे राहत होती. आरोपी शिल्पा हिला दोन्ही मुलीच होत्या. आरोपीला दुसऱ्या वेळी मुलगा व्हावा अशी तीव्र इच्छा होती परंतु, दुसऱ्यावेळी देखील मुलगीच झाल्यामुळे ती नाराज होती. ५ मार्च २०२१ रोजी तिचे पती रत्नागिरी येथे गेलेले असताना दुपारच्या सुमारास तिने तिच्या एक महिन्याच्या मुलीस घरातील पाण्याने भरलेल्या बादलीत डोके खाली पाय वर अशा स्थितीत ठेवून तिचा खून केला व शेजारचे लोक गोळा झाल्यावर बेशुध्द पडल्याचे नाटक करुन 'ती मी नव्हेच' असा बेबनाव केला.

सुरुवातीला सावर्डे पोलीस ठाणेच्या पोलिसांनी आस्कमिक मृत्यू नोंद करुन चौकशी केली. परंतु, गुन्ह्याची सर्व परिस्थिती व एकुण पार्श्वभूमी विचारात घेत मुलीचा खूनच झाला आहे, असे निष्पन्न झाल्यामुळे भा.दं.वि. कलम ३०२ अन्वये सुरुवातीस अज्ञात आरोपीविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला. परंतु पोलीस उपअधिक्षक सचिन बारी यांनी या गुन्ह्याचा सखोल तपास करुन आरोपी माता शिल्पा प्रविण खापले हिनेच खून केल्याचे तपासाअंती निष्पन्न झाल्याने तिच्या विरुध्द आरोपपत्र दाखल केले.

या खटल्याची सुनावणी चिपळूण येथील जिल्हा न्यायाधीश डॉ. अनिता श्रीरंग नेवसे यांच्या समोर झाली. सरकार पक्षातर्फे ॲड. अनुपमा ठाकूर यांनी आरोपीचा गुन्हा शाबित करण्याकरिता एकूण १५ साक्षीदार तपासले. आरोपीचे दुष्कृत्य म्हणजेच एक महिन्याच्या बाळाला मुलाच्या हव्यासापोटी पाण्याने भरलेल्या बादलीमध्ये बुडवून ठार मारुन बेबनाव करणे. या बाबी शाबित करण्यासाठी सर्वोच्च व उच्च न्यायालयाचे विविध न्यायनिवाडे सादर केले.

अभिलेखावरील सरकार पक्षाचा एकंदरीत साक्षीपुरावा, वैद्यकीय अधिकारी, पोलीस अधिकारी, शेजारी राहणाऱ्या साक्षीदारांनी दिलेली महत्त्वपूर्ण साक्ष व सखोल युक्तीवाद ग्राह्य धरुन सत्र न्यायाधीश डॉ. अनिता श्रीरंग नेवसे यांनी आरोपीस दोषी धरले व भा.दं.वि कलम ३०२ अन्वये आजन्म कारावास व २५

(पान २ वर)


## संविधान दुरूस्ती विधेयक निश्चित मंजूर होणार

### अमित शाह यांनी व्यक्त केला विश्वास

### 'मोदींनी पंतप्रधानपदाचा समावेश करण्याचा आग्रह धरला'

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**

विरोधी पक्ष तीव्र विरोध करत असले तरी, संविधान (१३० वी दुरुस्ती) विधेयक, २०२५ निश्चितच मंजूर होईल, असा विश्वास केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी व्यक्त केला. या विधेयकात असे प्रस्तावित केले आहे की जर पंतप्रधान, मुख्यमंत्री किंवा कोणताही मंत्री पाच वर्षे किंवा त्याहून अधिक शिक्षा असलेल्या गंभीर गुन्ह्याअंतर्गत सलग ३० दिवस कोठडीत राहिला तर त्याला आपल्या पदावरून पायउतार व्हावे लागेल. शाहा म्हणाले की, हे विधेयक संवैधानिक नैतिकता आणि जनतेचा विश्वास राखण्यासाठी आहे. ते सत्ताधारी पक्षासह सर्व नेत्यांना समानपणे लागू होईल. हे कोणत्याही विशिष्ट पक्षाला किंवा नेत्याला लक्ष्य करण्यासाठी आणलेले नाही.



त्यांनी विश्वास व्यक्त केला की, काँग्रेस आणि विरोधी पक्षातील अनेक लोक नैतिकतेचे समर्थन करतील आणि या विधेयकाच्या मंजुरीला पाठिंबा देतील. हे विधेयक ३१ सदस्यीय संयुक्त संसदीय समिती (जेपीसी)कडे सविस्तर छाननीसाठी पाठवण्यात आले आहे, जी त्यावर सूचना देईल.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे कौतुक करताना ते म्हणाले, पंतप्रधानांनी स्वतः या विधेयकात पंतप्रधानपदाचा समावेश केला आहे. यापूर्वी इंदिरा गांधींनी ३९ वी घटनादुरुस्ती आणली होती आणि राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, पंतप्रधान आणि सभापतींना न्यायालयीन चौकशीपासून संरक्षण दिले होते. परंतु नरेंद्र मोदीजींनी स्वतःविरुद्ध एक घटनादुरुस्ती आणली आहे की जर पंतप्रधान तुरुंगात गेले तर त्यांना राजीनामा द्यावा लागेल. संसदेत सादर करण्यात आलेल्या संविधान (१३० व्या

(पान २ वर)

## 'माझे रेल्वेचे इंजिन थांबले'

### मनसेतून बडतर्फ केल्यानंतर पत्रकार परिषदेत वैभव खेडेकर यांची भावनिक प्रतिक्रिया

**राकेश कोळी / खेड**



"माझे रेल्वेचे इंजिन थांबले..." अशा शब्दांत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतून बडतर्फ केल्यानंतर कोकणातील ज्येष्ठ मनसे नेते व खेड नगर परिषदेचे माजी नगराध्यक्ष वैभव खेडेकर यांनी आपली वेदना व्यक्त केली.

पत्रकार परिषदेत बोलताना खेडेकर भावुक झाले. त्यांनी सांगितले, "आज सोशल मीडियावर पत्र पाहून धक्का बसला. हे पत्र माझ्या निष्ठेचे सर्टिफिकेट आहे. तीस वर्षे पक्ष कुटुंबाशी जोडलेलो होतो, पण आजच्या पत्रामुळे त्या नात्याला ब्रेक बसला."

यावेळी खेडेकर पुढे म्हणाले, "मनसेसाठी कोकणात मी बीजे रुजवली. खेड नगर परिषद पंधरा वर्षे मनसेच्या ताब्यात राहिली. मी पहिल्यांदाच थेट नगराध्यक्ष झालो. कोविडच्या काळात, पक्ष संकटात असताना मी नेहमी लोकांसोबत राहिलो. पण आज माझ्या निष्ठेला संशयाने पाहिले गेले. भाजपच्या काही नेत्यांना भेटलो म्हणून पक्षांतर करतोय असा गैरसमज

(पान २ वर)

## भिंतीवरून उडी मारून पलायन करणारा आमदार ईडीच्या ताब्यात

**कोलकोता (वृत्तसंस्था)**

पश्चिम बंगालमधील शाळांमध्ये शिक्षक आणि कर्मचाऱ्यांच्या भरतीतील कथित अनियमिततेच्या चौकशीच्या संदर्भात ईडीने छापे टाकले. छाप्यादरम्यान सत्ताधारी तृणमूल काँग्रेसचे आमदार जीवन कृष्णा साहा यांनी भिंतीवरुन पळून जाण्याचा प्रयत्न केला. ईडीने नाट्यमयरित्या सोमवारी त्यांना अटक केली. यावेळी त्यांनी त्यांचे फोनही घरामागील नाल्यात फेकून दिले. नंतर अधिकाऱ्यांनी हा फोन जप्त केला.

पश्चिम बंगालच्या मुर्शिदाबाद जिल्ह्यातील आमदार साहा यांच्या निवासस्थानी छापे टाकल्यानंतर केंद्रीय तपास यंत्रणेने त्यांना ताब्यात घेतले. ईडी आणि केंद्रीय राखीव पोलीस दल अधिकाऱ्यांनी झाडे आणि कचरा पसरलेल्या परिसरातून ही कारवाई करण्यात आली.

(पान २ वर)

## कुंभारखणीखुर्द येथे कुत्र्याचा पाठलाग करताना बिबट्या अडकला बाथरूममध्ये

### वनविभागाने बिबट्याला सुरक्षितरित्या ताब्यात घेत नैसर्गिक अधिवासात केले मुक्त

**निलेश जाधव / देवरूख**

संगमेश्वर तालुक्यातील कुंभारखणीखुर्द येथे कुत्र्याचा पाठलाग करताना बिबट्या बाथरूममध्ये अडकल्याची घटना सोमवारी पहाटे

(पान २ वर)



## लग्नाचे आमिष दाखवुन तरुणीला फसविणाऱ्या संगमेश्वर तालुक्यातील ग्रामसेवकाला अटक

### तरुणीच्या मनाविरुद्ध करून घेतला गर्भपात

### ग्रामसेवकाला दोन दिवसांची पोलीस कोठडी

**देवरूख (प्रतिनिधी)**

मेट्रोमोनियल शादी डॉटकॉमवरुन एका तरुणी बरोबर ओळख झालेल्या तरुणाने लग्नाचे आमिष दाखवुन वेळोवेळी शरीरसंबंध प्रस्थापित करुन तिला गरोदर केले. तसेच तिचा विश्वास संपादन करुन तिच्या मनाविरुद्ध गर्भपात केला. याप्रकरणी संगमेश्वर तालुक्यात ग्रामसेवक म्हणून कार्यरत असणाऱ्या हरीदास शिवाजी बंडगर (मूळ गाव सलगर, ता. कवठेमहांकाळ जि. सांगली) याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला असुन देवरुख पोलिसांनी त्याला सोमवारी अटक केली आहे.

(पान २ वर)

## लाडक्या बहिणींना केवायसी अनिवार्य

### अन्यथा खात्यात १५०० रुपये जमा होणार नाहीत

### जिल्हा यंत्रणेकडून होणार छाननी

**मुंबई**



राज्य सरकारच्या महत्त्वाकांक्षी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेवरुन सध्या जोरदार गदारोळ सुरू आहे. योजनेच्या लाभार्थी महिलांची कसून छाननी सुरू असताना दररोज नवीन बोगस लाभार्थी समोर येत आहेत. अलीकडेच, लाडकी बहीण योजनेतून २६ लाख ३४ हजार बोगस महिलांनी लाभ घेतला असल्याचे समोर आले होते. यामुळे सरकारचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले आहे. आता

(पान २ वर)